# सलग पाच वर्षे: भारत, वर्ष २०२२ मधील सर्वात मोठा इंटरनेट शटडाऊनचा दोषी आहे

वर्ष २०२२ मध्ये, प्रशासनाने **३५** देशांमध्ये किमान **१८७** वेळा इंटरनेट बंद केले. भारताने किमान **८४** वेळा इंटरनेट बंद केले - सलग पाचव्या वर्षी जगातील कोणत्याही देशाच्या तुलनेत ही सर्वाधिक संख्या आहे.

अॅक्सेस नाऊ आणि #कीपइटऑन (#KeepItOn) आघाडीचा नवा अहवाल, ***नियंत्रणाची शस्त्रे, शिक्षामुक्ती (इम्युनिटी) कवच: वर्ष २०२२ मधील इंटरनेट शटडाऊन*** चे आज **फेब्रुवारी २८** रोजी लाँच: द्वारे विशेषत: भारतातील मानवी हक्कांसाठी, एका विनाशकारी वर्षाच्या कालावधीच्या दरम्यान, जागतिक स्तरावर इंटरनेट शटडाऊनच्या पुनरुत्थानास उघड केले आहे आणि त्याचा उलगडा केला आहे. **संपूर्ण अहवाल**, **जागतिक स्नॅपशॉट** आणि **आशिया पॅसिफिक डीप डायव्ह** वाचा.

**अॅक्सेस नाऊ येथे, #कीपइटऑन (#KeepItOn) च्या मोहीम व्यवस्थापक फेलिसिया अँथोनिओ** म्हणाल्या, "सरकार, इंटरनेट शटडाऊनचा नियंत्रणाची शस्त्रे आणि शिक्षामुक्ती (इम्युनिटी)चे कवच म्हणून वापर करतात. "वर्ष २०२२ मध्ये, जम्मू-काश्मीर भागात लक्ष्यित ब्लॉकिंगपासून ते लोकांचा विरोध दडपण्यासाठी, विचार न करता लादण्यात आलेले शटडाऊन पर्यंत, भारतातील अधिकाऱ्यांनी भारताच्या ऑनलाइन क्षेत्रावर अधिक नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर परिश्रम घेतले. पण, हळूहळू, त्यांना जाणीव होत की, जग पाहत आहे आणि लोक विरोध करत आहेत.

ऑनलाईन अधिकारांवर पंतप्रधान मोदी यांच्या सरकारची पकड आणखी घट्ट करत, वर्ष २०२२ मध्ये भारतातील कोट्यवधी लोक आणि समुदायांविरुद्ध इंटरनेट शटडाऊनचे हत्यार वापरण्याचे काम प्रशासनाने सुरूच ठेवले. **मुख्य निष्कर्षांमध्ये पुढील बाबी समाविष्ट आहेत:**

- **एकूण (टोटल्स):** जगभरातील **३५** देशांमध्ये किमान **१८७** शटडाऊन, आशिया पॅसिफिकमधील **७** देशांमध्ये **१०२** शटडाऊन, भारतात **८४** अडथळे;
- **व्याप्ती (स्कोप):** वर्ष २०१६ पासून, जागतिक स्तरावर नोंद करण्यात आलेल्या एकूण शटडाऊनपैकी भारताचा वाटा सुमारे ५८% आहे;
- **लक्ष्यीकरण (टार्गेटिंग):** जम्मू-काश्मीरमध्ये प्रशासनाने किमान **४९** वेळा इंटरनेट सेवा खंडित केली, ज्यात जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये तीन दिवसांच्या संचारबंदी पद्धतीच्या शटडाऊनच्या सलग **१६** आदेशांचा समावेश आहे;
- **ट्रिगर्स:** निदर्शने, संघर्ष, शालेय परीक्षा आणि निवडणुका यासारख्या हाय-प्रोफाईल कार्यक्रमांदरम्यान अधिकाऱ्यांनी प्रवेशात हस्तक्षेप केला;
- **उपमजकूर (सब-टेक्स्ट):** वर्ष २०२१च्या तुलनेत घटनांची संख्या कमी असली, तरी केंद्र सरकारने शटडाऊनचे आदेश नोंदविण्यास आणि प्रकाशित करण्यास नकार देणे आणि शटडाऊनचा मागोवा घेण्यात तांत्रिक अडचणी येणे या बाबींचा अर्थ असा आहे की, सर्व अडथळे नोंदवले गेले नाहीत;
- **कल (ट्रेंड्स):** ऑनलाइन सामग्री आणि अॅप्लिकेशन्सना अवरोधित (ब्लॉक) केल्याने सेन्सॉरशिपमध्ये अभूतपूर्व वाढीस योगदान मिळत आहे;

- **शिक्षामुक्ती (इम्युनिटी):** सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आणि वारंवार संसदीय शिफारशी करण्यात आल्या असूनही, सरकारांनी शटडाऊन सामान्य केले आहे आणि फेडरल प्राधिकरणांनी पारदर्शकता आणि उत्तरदायित्वासाठी सर्वात मूलभूत यंत्रणा देखील तयार करण्यास नकार दिला आहे; आणि

- **सकारात्मक गोष्टी (पॉजिटिव्हज):** लोकप्रतिनिधी, न्यायालये, उद्योग आणि नागरी समाज उत्तरदायित्व आणि सरकारच्या नेतृत्वाखालील बदलांची मागणी करीत आहेत.

वर्ष २०२२ मध्ये अधिकाऱ्यांनी अफगाणिस्तान, बांगलादेश, चीन, भारत, म्यानमार, पाकिस्तान आणि श्रीलंका या आशिया पॅसिफिकमध्ये इंटरनेट बंद केले होते.

“गेल्या वर्षी, भारताने पृथ्वीवरील इतर कोणत्याही देशापेक्षा जास्त, म्हणजे ८४ वेळा इंटरनेट बंद केले,” असे, **वरिष्ठ आंतरराष्ट्रीय सल्लागार आणि अॅक्सेस नाऊचे एशिया पॅसिफिक पॉलिसी संचालक, श्री. रमन जीत सिंग चिमा** म्हणाले. "जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील मूलभूत अधिकारांवर हे ८४ हल्ले आहेत. जी-२० परिषदेचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या देशासाठी आणि २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पूर्वसंध्येला, या अडथळ्यांमुळे भारताच्या तांत्रिक अर्थव्यवस्थेचे आणि डिजिटल उपजीविकेच्या महत्त्वाकांक्षेचे भवितव्य धोक्यात आले आहे - ही खरोखरच जागतिक लाजिरवाणी बाब आहे.

**संपूर्ण अहवाल**, **जागतिक स्नॅपशॉट** आणि **आशिया पॅसिफिक डीप डायव्ह** वाचा.

---

**Media Contact**: press [at] accessnow [dot] org